संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी

नाशिक महानगरपालिका नाशिक

मध्यवर्ती भांडार विभाग

कोटेशन नोटीस २०१८

नाशिक महानगरपालिकेस खालील तक्तयात नमुद केलेले साहित्य पुरविणे कामी वार्षिक दर मंजुर करुन त्या दराने काम करणेस . मा. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक — भाखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग/३/ उद्योग दिनांक. १ डिसेंबर २०१६ अन्वये पारीत केलेल्या खरेदी पुस्तिकेतील ६.१७ परिशिष्ट - १७ अन्वये अ.क्रमांक. १४५ अन्वये पेपर (कागदी लिफाफे) हे सूक्ष्म व लघु उद्योगांकडून खरेदी करण्यासाठी राखीव ठेवण्यात आले असुन यांचेकडुन कोटेशन मागविण्यत येत आहे .

| अ.क्र | तपशिल | अंदाजे प्राकलन र. रुपये |
|---|---|---|
| १ | खाकी पाकिटे (मनपा छपाईसह) (मनप नमुन्या प्रमाणे) | ४०,८७५/- |
| | साईज ९ इंच X ४ इंच | |
| | साईज ११ इंच X ५ इंच | |
| | एकूण | ४०,८७५/- |

अटि / शर्त

१) वरील कामाचे कोटेशन पत्रक (अटिशर्तीसह www.nashikcorporation.in) या संकेत स्थळावर दि. ०३ /०७/२०१८ ते दि.०९ /०७/२०१८ या कालावधीत उपलब्ध आहे .

२) कोटेशन पाकिट सादरीकरणाची अंतीम मुदत दि. ०९ /०७ /२०१८ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन पाकिट स्विकारले जाणार नाही. कोटेशन पाकिटे मध्यवर्ती भांडार विभाग, राजीव गांधी भवन शरणपुररोड येथे स्विकारण्यात येतील .

३) सदरचे साहित्य नाशिक महानगरपालिका मुख्यालय किंवा आदेशात नमुद केल्याठिकाणी पोहोच करावे लागेल . त्यासाठी वेगळा वाहतुक खर्च देण्यात येणार नाही.

४) सदरचे दरपत्रकात सर्व करासह दर नमुद करावयाचे आहेत. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही. कोटेशन सोबत सूक्ष्म व लघु उद्योगाचा दाखला, पॅन कार्ड, तसेच जीएसटी नोंदणी बाबतचे कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

५) कोणतेही कोटेशन स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार निन्मस्वाक्षरीकार यांचा राहील

Sd/-

उप आयुक्त (प्र) तथा

खाते प्रमुख म.भांडार विभाग,

नाशिक महानगरपालिका नाशिक

<u>नाशिक महानगरपालिका , नाशिक</u>

<u>मध्यवर्ती भांडार विभाग</u>

<u>सर्व साधारण अटी शर्ती (ई कोटेशन)</u>

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही . सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्यामध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे

३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण मालाचा पुरवठा करणे / काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील . नियतकालिके

४) ज्यांची संपुर्ण किंवा भागशः कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र रु १२०/- चे जनरल □□□□म्पपेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल . तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल .

५) जी.एस.टी करासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही **टॅ**क्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .

६) मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास / काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर / केलेल्या कामावर / सेवा पुरविण्याच्या रकमेवर दर हजारी दर दिवसाला र. रु १ याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील.

८) एकुण बिलाच्या रक्कमेतुन कामाचे स्वरुप विचारात घेता आवश्यकतेनुसार ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल. मालाचा पुरवठा झाल्यानंतर सहा महिन्यापर्यंत मालाच्या दर्जाबाबत काही तक्रार न आल्यास अथवा प्रयोजनाचा हेतु पुर्ण झाल्यानंतर मागणीनुसार सदरची रक्कम परत करण्यात येईल.

९) मुदतीत मालाचा पुरवठा न झाल्यास / मुदतीत काम पुर्ण न केल्यास सदरचा माल / काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

१०) मंजुर नमुन्याप्रमाणे / स्पेशिफ़िकेशनप्रमाने मालावर पुरवठा न झाल्यास /काम न झाल्यास माल परत करण्यात येईल / अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील .

११) कोणताही माल मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन खरेदी करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही . याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही .

१२) अटी / शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील .

१३) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या मालाच्या दरात / कामाच्या दरात/सेवेच्या/दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पसे मिळणार नाही .

१४) पुरवठाधारकाने अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

१५) काही अपरिहार्य कारणास्तव देयके अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

१६) मा.शासनाचे गव्हमेंट ई मार्केटप्लस (GeM) पोर्टलवर सदरचे बाबीचे दर उपलब्ध असलेस आणि गुणवते बाबत साम्य असलेस अशा बाबत (GeM) वरील दराशी तुलना करणेत येईल. पोर्टलवरील दरापेक्षा कोटेशन दर कमी असलेस असे दर मंजुर करणे बाबत विचार करणेत येईल अन्यथा (GeM) वरील दराने खरेदी करणे बाबतचा अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

Sd/-
उप आयुक्त (प्र) तथा
खाते प्रमुख म.भांडार विभाग
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटि शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने माल पुरविण्यास / सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे . त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

नाशिक महानगरपालिका , नाशिक
मध्यवर्ती भांडार विभाग
कोटेशन फॉर्म 2018

**कामाचे नाव ;-** नाशिक महानगरपालिकेच्या विविध कार्यालया साठी खाकी पाकिटे (मनपा छपाईसह) मनपा नमुन्या प्रमाणे पाकिटाची खरेदी करणे कामीचे वार्षिक दर मंजुर करणे.
**कामाची मुदत ;-** १२ माहिने
**कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत ;-** दि. ०९/०७/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत
**कोटेशनधारकाचे नाव व पत्ता ;-** ---------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

**संपर्क क्रमांक ;-**----------------------

उक्त प्रमाणे कामाचे अटीशर्ती व स्पेशिफ़िकेशन नुसार साहित्य पुरविणेकामी मी / आम्ही पुढीलप्रमाणे सर्व करांसह दर सादर करीत आहोत .

| अ.क्र | तपशिल | दर सर्व करासह रक्कम रु | प्रमाण / एकक युनिट |
|---|---|---|---|
| १ | खाकी पाकिटे (मनपा छपाईसह) (मनप नमुन्या प्रमाणे) | | प्रती हजार |
| | साईज ९ इंच X ४ इंच | | |
| | साईज ११ इंच X ५ इंच | | |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटि शर्ती मी वाचले असुन मला त्या मान्य आहेत . सदर अटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराने १२ महिने कालावधीकरीता उक्त खाकी पाकिटाचा पुरवठा करण्यास मी तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे .

निविदाधारकाची सही व शिक्का